**पाहिजेत पाहिजेत**

➡ REQUIRE TALLY ACCOUNTANT किमान SALARY Rs.15000 Contact 7875447663

➡ जळगांव जिल्ह्यात व शहरात किराणा, डेअरी, मॉल इत्यादी ठिकाणी जाऊन तुप व श्रीखंड विक्रीसाठी सेल्समन (पुरुष/महिला) पगार दरमहा (१२००० फिक्स+PF+पेट्रोल कि.मी प्रमाणे+भत्ता+ इंसेन्टिव्ह) भेटा वेळ ११ ते ०४ अर्जासह पुनम एजन्सी,राजाराम मंगल कार्यालय,काऊ कोल्हे शाळेजवळ,जुने जळगांव.

➡ निर्व्यसनी व केन्द्रात राहुन काम करणारे निवासी कंपाऊंडर, कर्मचारी व कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत,भोजन+निवास फ्रि,संपर्क व्हॉटसअप करा 8208445814.8668908936



# देशदूत

शिल्पकार विकासाचा...



आपल्या प्रिय व्यक्तिला सर्वच व्यसनांपासुन मुक्त करा व आपले कुटुंब विस्कटण्या पासुन वाचवा...

गॅरंटीने सर्व व्यसन

**दारु सोडवा**

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

अपॉईंटमेंट 9552619752



इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक १३१ । बुधवार, दि. ७ मे २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर


## संपादकीय

### ही जखम कशी भरणार?

खान्देशात मंगळवारी दुपारी अचानक भरुन आलेल्या आकाशाकडे नजरा वळत नाहीत तोच गारपीटीला प्रारंभ झाला. जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये झाडे उन्मळून पडली. विजेचे खांब रस्त्यावर आडवे झाले. शेतात उभी असलेली पिके जमिनीला टेकली. त्यामुळे दोन ते तीन तासांत होत्याचे नव्हते झाले. बळीराजाचे तर कंबरच मोडले. आधीच मालाला नसलेला भाव त्यात सरकारने केलेली अडवणूक बियाण्याचे वाढलेले भाव याची चिंता असतांनाच आजच्या पावसाने खोलवर जखम केली आहे. सरकार पंचनाम्याचे आदेश देईल. पंचनामेही होतील; परंतु चार वर्षांपूर्वी झालेल्या नुकसानीची भरपाई अद्यापही मिळालेली नसतांना आता झालेल्या नुकसानीची भरपाई केव्हा मिळेल? याची शाश्वतीदेखील नाही. त्यामुळे अचानक झालेली ही जखम आता कशी भरुन निघणार? हाच प्रश्न सर्वांना पडला आहे. काय करावे? काय करु नये? अशा प्रश्नात शेतकरी आहे. अवकाळी पाऊस झालेल्या परिसरात तत्काळ भरपाई देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्री मुंबईत पोहोचल्यावर करतीलही परंतु गेल्या वर्षी झालेल्या नुकसानीत पीक विमा कंपन्यांचे गोडवे गात एप्रिलपासून वाटप झालेल्या पैश्यांची परिस्थिती बघितली तर अडीच हेक्टर ज्या शेतकऱ्याकडे शेती आहे. त्याला तीन ते साडेतीन हजार रुपयांच्यावर भरपाई मिळालेली नाही. एक ते दीडएकर शेती असलेल्या शेतकऱ्याला तर ८०० ते ९०० रुपये मिळालेले आहे. त्यामुळे सरकारवर विश्वास कसा ठेवावा? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. ४४ पर्यंत पोहोचलेले तापमान अचानक घसरले. तसेही प्रशासनाने अवकाळी पावसाची सूचना दिलेली होती. परंतु शेतात उभी असलेली पिके अशी अचानक झाकता येत नाही. त्यामुळे या पावसासोबतच वादळ व गारपीटदेखील जोरदार झाल्याने केळी, मका, लिंबू यासह कांदा या पिकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. जळगाव, धुळे, नंदुरबारसह राज्यात अन्यठिकाणीदेखील या पावसाने कहर केलेला आहे. अजून दोन दिवसतरी या अवकाळी पावसाचा तडाखा राज्यभरात बसणार आहे. त्यामुळे सर्वांनाच सावध राहावे लागणार आहे.









# अवकाळीची सर्जिकल स्ट्राईक

## जिल्हाभरात बत्ती गूल : पिकांचे नुकसान; गारपिटीचा तडाखा; घरांची पडझड

### विद्युत पुरवठा खंडित

जळगाव । विद्युत तारांवर झाडे, फांद्या तुटून पडल्याने विद्युत पुरवठा शहरासह तालुक्यात खंडीत झाला आहे. तो सुरळीत करण्यासाठी विद्युत विभागाची चांगलीच दमछाक होत आहे. महामार्गावरील वाहतुक खोळंबली- ऐन दुपारच्या वेळेस अचानक आलेल्या सुसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस आल्याने महामार्गावरील वाहतुकदार, प्रवासी वाहनधारकांनी जेथे आडासो मिळेल तेथे थांबणे पसंत केले. यात तरसोद फाट्यावरील नव्याने तयार होत असलेल्या उड्डाणपुलाखाली वाहने तांबल्याने व याठिकाणी एकच मार्गी वाहतूक असल्याने पाऊस थांबे पर्यंत वाहतुकीचा खोळंबा झाला. एव्हढेच नाही तर वादळाचा वेग जास्त असल्याने महामार्गावर असलेले सूचना फलक, जाहीरात होर्डींगसही कोसळल्याचे दिसून आले.

जळगाव । शहरासह जिल्ह्यात मंगळवार दि.६ रोजी विजांच्या कडकडाटासह वादळी वारा व गारपीटीसह अवकाळी पावसाचा तडाखा बसला. अचानक आलेल्या या वादळी पावसामुळे शेती पिकांसह घरांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी विजेच्या तारा तुटल्या त्यामुळे दुपारपासूनच विज पुरवठा खंडीत झाला तो अनेक तालुक्यांमध्ये रात्री उशिरापर्यंत सुरळीत झाला नव्हता. तर रावेर,यावल व जळगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने केळीबागांसह फळबांगाचे अतोनात नुकसान झाले आहे. सुदैवाने



जिवित हाणीचे वृत्त नसले तरी पशुधनाला मात्र मोठा फटका बसला असून एरंडोल येथे वीज पडून बैल ठार झाला तर अन्य ठिकाणी देखील पशुधन दगावल्याचे समजते.

हवामान खात्याने वातावरण बदलाचा व वादळी पावसाचा अंदाज आधीच वर्तविला होता. वाढते तापमान व उकाड्याने हैराण झालेल्या नागरीकांना या पावसामुळे काहीचा दिलासा मिळाला असला तरी वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाचा तडाखा बसल्याने काढणीला आलेल्या उन्हाळी शेती पिकांसह फळ बागा, भाजीपाला पिकाला मोठा फटका बसला आहे.

पान २ वर »

### पालकमंत्र्यांनी दिले पंचनाम्याचे आदेश

जळगाव । जिल्ह्यात आज दुपारनंतर झालेल्या अवकाळी पावसामुळे तसेच गारा पडल्याने काही तालुक्यांमध्ये शेती पिकांचे, घरांचे व जनावरांचे नुकसान झाल्याच्या प्राथमिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कोणताही विलंब न करता नुकसानग्रस्त भागांतील पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, असे निर्देश पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. काही भागांमध्ये रस्त्यांवर झाडे व वीज तारा पडल्याच्या तक्रारी असून, अशा ठिकाणी तातडीने झाडे हटवून रस्ते मोकळे करावेत तसेच वीज तारा दुरुस्त करून खंडित वीजपुरवठा सुरळीत करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. महसूल, कृषी आणि पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## खान्देशात भुसावळला होणार मॉक ड्रील

मुंबई । भारत-पाकिस्तानमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना मॉक ड्रील करण्याचा आदेश दिला आहे. युद्ध स्थितीचा कसा सामना करायचा त्यासाठी हे मॉक ड्रील आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, उद्या ७ मे रोजी ही मॉक ड्रील होणार आहे. शत्रू देशाच्या हल्ल्यापासून कसा स्वत:चा बचाव करायचा, ते ट्रेनिंग या दरम्यान नागरिकांना दिले जाईल. सिविल डिफेंस म्हणजे नागरी सुरक्षा अधिक भक्कम करणे हा या मॉक ड्रीलमागे उद्देश आहे. देशात शेवटची मॉक ड्रील १९७१ साली भारत-पाकिस्तान युद्धाच्यावेळी झाली होती. खान्देशात भुसावळ येथे ही मॉक ड्रील होणार आहे.

मॉक ड्रिलच्या पार्श्वभूमीवर मुंबईत डीजी कार्यालयात महत्त्वाची बैठक. बैठकीत वरिष्ठ पोलीस अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी तसेच नागरी सुरक्षा दलाचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत सात मे रोजी होणाऱ्या मॉक ड्रिलच्या तयारीचा आढावा घेत आपत्कालीन परिस्थितींमध्ये नागरिकांनी कशा प्रकारे वागावे, यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या.तीन सत्रांमध्ये ही मॉक ड्रिल राबवण्यात येणार असून, यामध्ये सायरन तपासणी, नागरिकांचे स्थलांतर, बचाव कार्य आदी प्रात्यक्षिकं घेतली जाणार आहेत.

प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना अलर्ट राहण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारकडून अंतर्गत पातळीवर हालचालींना वेग आला असून पालकमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांना प्रशासनासोबत संपर्कात राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नाशिक जिल्ह्यात नाशिक,मनमाड आणि

पान २ वर »

### या शहरात होणार मॉक ड्रील

मुंबई, उरण, तारापूर, ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-नागोठणे, मनमाड, सिन्नर, पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,



### मॉक ड्रीलवेळी काय कराल?

- सायरन वाजल्यावर तात्काळ सुरक्षित आश्रयस्थळी जालं.
- ५ ते १० मिनिटात सुरक्षित ठिकाणी पोहोचा.
- सायरन वाजल्यानंतर घाबरुन जाऊ नका.
- फक्त मोकळ्या जागेपासून लांब रहा.
- घरात आणि सुरक्षित इमारतींच्या आत प्रवेश करा.
- टीव्ही, रेडियो, सरकारी अलर्ट्सवर लक्ष द्या.
- अफवावर विश्वास ठेऊ नका
- सायरन कुठे-कुठे लागणार?
- सरकारी भवन
- प्रशासनिक भवन
- पोलीस मुख्यालय
- फायर स्टेशन
- सैन्य ठिकाणं
- शहरातील मोठे बाजार
- गर्दीच्या जागा
- सिविल मॉक ड्रिलमध्ये कोण-कोण?
- जिल्हाधिकारी
- स्थानीय प्रशासन
- सिविल डिफेंस वार्डन
- पोलिसकर्मी
- होम गाड्र्स
- कॉलेज-स्कूल विद्यार्थी
- नॅशनल कॅडेट कॉर्प्स
- नॅशनल सर्विस स्कीम
- नेहरू युवा केंद्र संगठन

## निवडणुकांचा चार आठवड्यांत निर्णय घ्या!

### स्थानिक स्वराज्य संस्थाबाबत राज्य सरकारला 'सर्वोच्च' निर्देश

मुंबई । स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गाचे आरक्षण (ओबीसी), सदस्य संख्या, प्रभाग रचना आदी कारणांमुळे न्यायालयीन कचाट्यात अडकलेल्या राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा मार्ग मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाच्या



निर्णयाने मोकळा झाला. गेल्या अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे दिवाळीनंतर स्थानिक निवडणुकीचा बार उडणार हे आता स्पष्ट झाले आहे.

राज्यातील २९ महापालिका, २२८ नगर परिषदा, २९ नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा आणि २८९ पंचायत समित्यांची मुदत संपली आहे. मुदत



संपल्याने या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासक राजवट आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह राजकीय पक्षांचे डोळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे लागले आहे. न्यायालयाने निवडणुकांना हिरवा कंदील दाखवल्याने राज्यात लवकरच मिनी विधानसभा निवडणुकीचे वारे वाहणार आहेत. मुंबईसह राज्यातील २७ जुन्या आणि नव्याने अस्तित्वात आलेल्या २ अशा एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा मार्ग न्यायालयाच्या आदेशाने मोकळा झाला आहे. यापैकी छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली आणि कोल्हापूर या पाच महानगरपालिकांची मुदत संपून तर तब्बल पाच वर्षे झाली आहेत. तर मुंबई महानगरपालिकेची मुदत मार्च २०२२ मध्ये संपली होती. तेव्हापासून राज्यातील २९ महानगरपालिकांचा कारभार प्रशासकांच्या हातात आहे. राज्यातील ३४ जिल्हा परिषदांपैकी २५ जिल्हा परिषदांची मुदत २०२२ रोजीच संपली आहे. तर ठाणे जिल्हा परिषदेची मुदत २०२३ मध्ये संपली आहे. सहा जिल्हा परिषदांची मुदत या वर्षीच्या सुरुवातीला संपली. तर भंडारा आणि गोंदिया या जिल्हा परिषदांची मुदत २०२७ मध्ये संपणार आहे. त्यामुळे आता राज्यातील ३४ पैकी



३२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचा मार्क मोकळा झाला आहे. दरम्यान, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यात घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने आता कोणताही विलंब न करता आणि कोणतीही पळवाट न शोधता या निवडणुका घेऊन नगरसेवक, महापौर, सभापती पदाचे पूर्ववैभव आणावे, असे आवाहन कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1875 |
| नवती (२) | : 1675 |





## आता १५० दिवसांचा दुसरा कृती आराखडा जाहीर

मुंबई । विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित १५० दिवसांचा दुसरा कृती आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी चोंडी (जि. अहिल्यानगर) येथे जाहीर केला. या कृती आराखड्याचा तपशील आज, बुधवारी जाहीर केला जाणार आहे. चोंडी येथे आयोजित राज्य मंत्रिपरिषदेच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना फडणवीस यांनी १५० दिवसांच्या नव्या कार्यक्रमाची घोषणा केली. १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा आणि धोरणात्मक बाबींवर आधारित कार्यक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. राज्यातील १२ हजार ५०० शासकीय कार्यालये या कार्यक्रमात सहभागी झाली. मंत्रालयातील ४८ विभाग या कार्यक्रमात सहभागी झाले. या विभागातील ९०२ विषयांवर धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असताना ७०६ विषयांवर आधारित निर्णय घेऊन आवश्यक बदल करण्यात आले.

## अहिल्यादेवी स्मृतीस्थळासाठी ६८१ कोटींचा आराखडा

### अहिल्यानगर येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय

अहिल्यानगर । मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर येथे ऐतिहासिक राज्य मंत्रिपरिषद घेण्यात आली होती. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. चौंडी येथे अहिल्यादेवी होळकरांचे स्मृतीस्थान जतन आणि संवर्धनाकरता कोट्यवधींचा निधी मंजूर करण्यात आला असून अहिल्यानगर येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. कॅबिनेट बैठक संपल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत यासंदर्भातील माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदेही उपस्थित होते. चौंडीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं स्मृतीस्थळ जतन आणि संवर्धनाकरता ६८१ कोटींचा आराखडा मान्य केला आहे. यातून विविध प्रकारची कामं होतील. अखिल भारतीय स्तराचं एक प्रेरणास्थळ आणि तीर्थस्थळ म्हणून हे तयार झालं पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न केला आहे. यासोबत त्रिशताब्दीचं औचित्य साधून याच बैठकीत अष्टविनायक गणपती मंदिरांचा जिर्णोद्धार १४७ कोटी रुपये, श्री क्षेत्र तुळजा भवानी मंदिर विकास आराखडा १८६५ कोटी, श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर विकास आराखडा २५९ कोटी रुपये, त्र्यंबकेश्वर विकास आराखडा २७५ कोटी रुपये, श्री क्षेत्र महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा १४४५ कोटी रुपये, श्री क्षेत्र माहुरगड विकास आराखडा ८२९ कोटी रुपये असे जवळपास ५ हजार ५०३ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता दिली आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### बहुभाषिक चित्रपट निर्माण करणार

जे कार्य देशात अहिल्यादेवींनी केलं, तेच कार्य त्यांच्या त्रिशताब्दीनिमित्ताने राज्य सरकारच्या माध्यमातून करत आहोत. पुण्यश्लोक अहिल्या देवींचं जीवन आणि कार्य याचा परिचय संपूर्ण जगाला झाला पाहिजे, या करता त्यांच्या जीवनावर बहुभाषिक कर्मशिअल चित्रपट निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे, असं ते म्हणाले.

## कुंभमेळासाठी प्राधिकरणाचा अध्यादेश

मुंबई । नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सन २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या अनुषंगाने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याच्या अध्यादेशास मंगळवारमंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

प्राचीन शास्त्रांनुसार नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा लाखो भाविकांना आकर्षित करणारा आध्यात्मिक सोहळा आहे. या पर्वात देशभरातून तसेच परदेशातून कोट्यवधी भाविक, साधू-संत, विविध अखाडे, यात्रेकरू, पर्यटक आणि अभ्यासक सहभागी होतात. सन २०१५ मध्ये झालेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात सुमारे अडीच कोटी भाविकांनी सहभाग घेतला होता. येत्या कुंभमेळ्यासाठी भाविकांची संख्या चार ते पाच पट वाढण्याची शक्यता आहे. यामुळे या महाकाय धार्मिक उत्सवासाठी अत्यंत व्यापक आणि कार्यक्षम नियोजन, सुयोग्य समन्वय यांची आवश्यकता असल्याने त्यासाठी प्राधीकरणाची गरज होती. नुकताच प्रयागराज उत्तर प्रदेश येथे कुंभमेळा पार पडला. येथे नियंत्रण आणि समन्वयासाठी कुंभमेळा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होती.